<u>परिशिष्ट "अ"</u>

**लिलाव तारीख २२/०४/२०२५**

<u>विक्रीची अधिसुचना</u>

गडचिरोली येथील मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली यांच्या न्यायालयातील

| अ.क्र. | जडसंगंह क्रमांक | जडसंग्रह वस्तूचे नांव व विवरण | नग |
|---|---|---|---|
| १. | L&J/DJG/XM/03/2011 | Panasonic copier-DP 8020 With Copier & Print No. PJGFC1747ZA | १ नग |
| २ | L&J/DJG/XM/02/2008 | Kilburn copier-DP 2035 with copier and Print No. PGD8613996 | १ नग |
| ३ | L&J/DJG/XM/05/2015 | Kyocera/F S-6530MFP | १ नग |

याद्वारे नोटिस देण्यात येते की, वर उल्लेखिलेल्या जडसंग्रह वस्तु या अधिसुचनेला जोडलेल्या व अनुसुचिमध्ये नमुद केलेले जडसंग्रह वस्तु लिलाव पध्दतीने विकण्याविषयी या न्यायालयाकडुन हुकुम देण्यात आला आहे.

सदर वस्तु जाहिर लिलाव करून विकण्यात येईल व उक्त अनुसुचित विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मालमत्ता विक्रीसाठी ठेवण्यात येईल किंवा विक्रीच्या वेळी तिचा लिलाव करण्यात येईल. दरम्यान कोणत्याही तहकुबीचा आदेश न झाल्यास सरहू विक्रीचे काम प्रबंधक, सहायक अधिक्षक(बाध) व वरिष्ठ लिपीक (जडसंग्रह) यांच्याकडुन जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोलीचे प्रांगणात दिनांक २२/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता चालविण्यात येईल.

विक्रीच्या वेळी उक्त लिलावात स्वारस्य असणा-या सर्व लोकांना जातीने किंवा यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या एजंटामार्फत हजर राहता येईल.

<u>लिलाव विक्रीच्या इतर शर्ती खालीलप्रमाणे आहेत.</u>

१) खालील अनुसुचित निर्दिष्ट केलेला तपशिल न्यायालयाच्या संपूर्ण माहितीप्रमाणे दिलेला आहे. तथापि, या उद्घोषनेतील कोणत्याही चुकीबद्दल, खोटया माहितीबद्दल किंवा खोटया तपशिलीबद्दल न्यायालय जबाबदार राहणार नाही.

२) लिलावातील बोली कोणत्या रक्कमेने वाढवायची ते विक्रीचे काम चालविणा-या अधिका-याकडून ठरविण्यात येईल. लिलाव किती रक्कमेस मागितला किंवा कोणी मागितला याबाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास संबंधित गटाचे ताबडतोब पुन:लिलाव केले जातील.

३) जो कोणी कोणत्याही गटाची सर्वात जास्त किंमत देऊ करील त्याला त्या गटाचा कायदेशीर खरेदीदार ठरविण्यात येईल. मात्र नेहमी असे समजावे की, तो बोलीदार लिलाव मागण्यास कायदेशीर रितीने सक्षम असला पाहिजे. आणखी पुढे असे ठरविण्यात येत आहे की, सर्वात जास्त किंमतीच्या बोलीत देऊ काढलेली

..२..

किंमत जेव्हा स्पष्टपणे अपूरी असल्याचे दिसून येईल की, ती बोली नाकारणे योग्य होईल. तेव्हा दंडाधिकारी किंवा विक्रीचे काम चालविणारे अधिकारी हे त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार ती बोली नाकारू शकतील.

४) विक्रीचे काम चालविणा-या अधिका-याला आवश्यक वाटल्यास तो लिलाव स्थगित करण्याची कारणे नमुद करून विक्रीचे काम स्थगित करू शकतो.

५) प्रत्येक गटांची किंमत विक्रीचे वेळी अगर त्यानंतर विक्रीचे काम चालविणारा अधिकारी फर्माविल त्यावेळी दिली पाहिजे. व त्यात कसुर झाल्यास उक्त मालमत्तेचा ताबडतोब पुन्हा लिलाव केला जाईल. आणि ती पुन्हा विकली जाईल, व अशा दुस-या लिलावाचे वेळी जर सदर वस्तुची किंमत कमी झाली तर मुळ लिलावाच्या वेळी पैसे भरण्यास कसूर करणा-या व्यक्तीकडून विक्रीतील तृटीची रक्कम वसुल केली जाईल व ती तशी वसुल न झाल्यास ती रक्कम सदर व्यक्तीची जंगम मालमत्ता जप्त करून वसूल केली जाईल.

आमच्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

दिनांक :०९/०४/२०२५

प्रमुख जिल्हा व सत्र, न्यायाधिश,
गडचिरोली

**जडसंग्रह वस्तुची अनुसूची**

| अ. क्र. | जडसंग्रह वस्तुचे नांव | जडसंग्रह वस्तुचे कंम्राक | वस्तूची संख्या. | किमंत प्रति नग |
|---|---|---|---|---|
| १ | Kilburn copier-DP 2035 with copier and Print No. PGD8613996 | L&J/DJG/XM/02/2008 | १ नग | ८४,७९६/- |
| २ | Panasonic copier-DP 8020 With Copier & Print No. PJGFC1747ZA | L&J/DJG/XM/03/2011 | १ नग | ९५,७६०/- |
| ३ | Kyocera/F S-6530MFP | L&J/DJG/XM/05/2015 | १ नग | १,७०,०७०/- |

सदर अनुसूची ही मा. जिल्हा न्यायालय, गडचिरोलीचे नोटिस बोर्डावर तसेच संकेत स्थळावर प्रकाशित करून बेलिफ अहवाल नमुद करावा.

दिनांक ०९/०४/२०२५.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
गडचिरोली

प्रत :-

१. नगरपरिषद, गडचिरोली यांचे नोटिस बोर्डावर लावण्यास अग्रेसित.
२. तहसिल कार्यालय गडचिरोली यांचे नोटिस बोर्डावर लावण्यास अग्रेसित.
३ जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यास अग्रेसित.